# कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

## बांधकाम विभाग रत्नागिरी, जिल्हा परिषद रत्नागिरी

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, रत्नागिरी - 415 612

| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२२४२/२२००७६ | email-ee_wd_rtnzp@yahoo.in | |
|---|---|---|
| जा.क्र.रजिप/बांधकाम/लेशा/निविदा/ २७०९ /२०२३ | दिनांक | ०३/०५/२०२३ |


प्रति,

श्री.किरण विजय चाळके

मु.पो.चाफवली ता.संगमेश्वर जिल्हा-रत्नागिरी

विषय :- कामाचे कार्यारंभ आदेश.....

कामाचे नाव- चाफवली बौध्दवाडी कॉजवेजवळ संरक्षक भिंत बांधणे ता.संगमेश्वर

लेखशिर्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना २२-२३

अंदाजपत्रक र. २००००००/- मंजूर अनुदान- २००००००/-

निविदा रक्कम १७४५२७७/- मंजूर निविदा दर अंदाजपत्रकीय

महोदय,

आपण खुली निविदा सूचना क्र.१९ सन २०२२-२३ मधील दि.१७/०३/२०२३ रोजी दिलेली उपरोक्त कामांची निविदा अंदाजपत्रकीय दराने मंजूर झालेली असल्याने तसेच रक्कम रुपये १५००/- च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण करुन दिल्याने काम सुरु करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उप अभियंता संगमेश्वर यांचेकडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरुवात करावी. कामाची मुदत दि.०३/०५/२०२३ ते दि.०२/०२/२०२४ अशी असेल.मूल्यांकनाप्रमाणे वस्तु व सेवाकराची रक्कम मक्तेदाराला स्वतंत्ररित्या अदा करण्यात यईल.निविदा रकमेमधील अंतर्भुत गौणखनिजाची रक्कम मूल्यांकनानुसार अदा केली जाईल .मक्तेदाराने कमी /अधिक दराने भरलेले निविदा गौणखनिज दर व गुणनियंत्रण चाचणी शुल्कासाठी लागू रहाणार नाहीत.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/ ३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. <u>कामाचा विमा उतरविल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी अन्यथा कामाचे देयक आदा केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी</u>. तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल.ग्रामविकास विभाग शासन पत्र दि.१५.०५.२०२० मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.जी.एस.टी.नंबर आवश्यक व देयकातुन शासकिय नियमानुसार वस्तू व सेवा कराची कपात करणेत येईल.सदरच्या कामाचा दोषदायित्व निवारण कालावधी काम संपलेच्या दिनांकापासून १० वर्षांकरीता राहिल.करारनाम्यातील सर्व अटींचे व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

**महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रं. पंरास-२०१५/ प्र.क्र. ३४६/ पंरा८,दि.१३ एप्रिल २०१७ चे परिपत्रकानुसार संबंधीतानी डांबराचे काम सुरु करणेपुर्वी व काम पुर्ण केल्यानंतर शासन परिपत्रकानुसार अटी व शर्तीचे पालन करावयाचे आहे.**

**सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा सांकेतांक क्र.** 202305159116 **असा आहे.**

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग रत्नागिरी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

प्रत-गट विकास अधिकारी पंचायत समिती **संगमेश्वर** यांना माहितीसाठी

प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **संगमेश्वर** यांचकडे

२/- सदर कामासाठी वापरली जाणारी जागा शासनाच्या मालकीची असल्याची खात्री झाल्यानंतर जागेची कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन तसेच कामाचा विमा उतरवला असल्याची खात्री झाल्यानंतर आखणी करुन प्रत्यक्षात कामास सुरुवात करावी व ती कागदपत्रे प्रथम देयकासोबत जोडण्यात यावीत जागेची कागदपत्रे व विमा न जोडल्यास देयक पारित केले जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल. मक्तेदारांकडून मुदतीत काम पूर्ण करुन घ्यावे. प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीचे पालन करावे. मंजूर अनुदापेक्षा जास्त खर्च करु नये त्यापेक्षा जास्त खर्च केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.ज्या कामांची प्रशासकीय मान्यता अन्य विभागामार्फत देण्यात आलेली आहे त्याबाबतीत जागेची कागदपत्रे उपलब्ध करुन देणेची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागाची राहील.

प्रत - पीओ-१ बांधकाम विभाग जि.प.**रत्नागिरी** यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

प्रत :- विमा संचालक, शासकीय विमा निधी, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण भवन (म्हाडा) २६४, पहिला मजला, कलानगर समोर वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- कार्यारंभ आदेश नस्तीस.